प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत—४१०२०१, जि. रायगड

जा.क्र.प्राकृसंकें/एकृप/ठेम/२२८३ /२०२३, दिनांक : १३/१२/२०२३
13 DEC 2023

# जाहिर प्रसिध्दी

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील सेंद्रीय शेती संशोधन प्रकल्पाच्या प्रक्षेत्रावरील कामे निव्वळ कंत्राटी पध्दतीने रब्बी २०२३—२०२४ या हंगामाकरीता दि. ०१ जानेवारी २०२४ ते २० मार्च २०२४ या कालावधीमध्ये करावयाची आहेत. सदरची कामे करण्यास इच्छुक असणाऱ्या अनुभवी कंत्राटदारांनी सोबत जोडलेल्या कामांसाठी आपले दरपत्रक या कार्यालयास दिनांक २७/१२/२०२३ पर्यत कार्यालयीन वेळेत सादर करावे. सोबत कामाच्या अटी व शर्ती तसेच कामाची यादी आपल्या माहितीसाठी सोबत जोडण्यात आली आहे.

सहयोगी संशोधन संचालक
प्रादेशिक कृषि संशोधनकेंद्र,
कर्जत—४१०२०१जि. रायगड

प्रत प्रसिध्दीसाठी—

१) मा. मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, कर्जत, जि.रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
२) मा. तहसिलदार, तहसिल कार्यालय, कर्जत,जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
३) मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, कर्जत. जि.रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
४) नोटीस बोर्ड, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, जि. रायगड.
५) डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ दापोली यांच्या संकेत स्थळावर

## प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील सेंद्रीय शेती संशोधन प्रकल्प प्रक्षेत्राची कामे ठेका पध्दतीने करावयाच्या कामांचे दरपत्रक

### दरपत्रकाचा विहीत नमुना

प्रति,                                                                                    दिनांक :

मा. सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत, जि. रायगड

**विषय : प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील सेंद्रीय शेती संशोधन प्रकल्प प्रक्षेत्रावर प्रायोगिक पिकांची विविध कामे ठेका पध्दतीने करण्यासाठीचे दरपत्रक ....**

संदर्भ : जा.क्र.प्राकृसंकें/एकृप/ठेम/ /२०२३ दि.

महोदय,

वरील संदर्भीय जाहीर प्रसिध्दी पत्रकान्वये प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील सेंद्रीय शेती संशोधन प्रकल्प प्रक्षेत्रावर प्रायोगिक पिकांची कामे ठेका पध्दतीने पूर्ण करण्यासाठीचे दरपत्रक खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| कामाचा तपशिल | रब्बी २०२३–२०२४ हंगामासाठी ( ०१ जानेवारी २०२४ ते २० मार्च २०२४) |
|---|---|
| सोबतच्या यादीमध्ये नमूद केलेल्या कामासाठीचे दरपत्रक | रूपये.......................................<br>अक्षरी ........................................ |

दरपत्रका सोबतच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. तरी कृपया माझे दरपत्रक मंजुर करावे ही विनंती.

आपला विश्वासू,

सही :

नांव :

पत्ता :

# कंत्राटी कामांच्या अटी व शर्ती

१. प्रक्षेत्रावरील कामे संबधीत विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख विभागाच्या आवश्यकतेनुसार नेमून देतील त्याप्रमाणे करणे आवश्यक राहील.

२. कामाच्या देयकाची आदायगी महिना पुर्ण झाल्यावर केली जाईल. त्यासाठी देयक सादर करतेवेळी विभाग प्रमुख/ प्रक्षेत्र अधिक्षक यांचे काम वेळेत पुर्ण केल्याबाबतचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

३. निविष्ठांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.

४. ठेकेदाराकडे स्वत:चे पॅन कार्ड व बॅक खाते असणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने कामगारांना कामाचे वेतन व त्याअनुष्यंगीक रक्कम संबधीत कामगारांच्या बॅक खाती जमा करणे आवश्यक आहे.

५. ठेकेदाराने नेमलेल्या मजुरांना शासनाच्या किमान वेतन दरानुसार किमान वेतन दिले जाते असे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

६. प्रक्षेत्रावरील मालमत्तेचे कामगारांकडून नुकसान झाल्यास ठेकेदारास जबाबदार धरले जाईल.

७. ठेक्यामध्ये असलेल्या मजूरांव्यतिरिक्त प्रक्षेत्रावर गरजेनुसार जादा मजूर विहीत कार्यपध्दती अवलंबून नेमण्याचा अधिकार संबधित विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना राहील.

८. ठेक्यातील मजूरांची किमान व कमाल वयोमर्यादा शासन निर्णयानुसार निश्चीत केलेली असावी.

९. याचिका क्र. १५९१/२०१८ संदर्भात मा. उच्च न्यायलय मुंबई यांच्या दिनांक १८ एप्रिल, २०१८ च्या निर्णयानुसार अंतरिम स्थगितीस अनुसरून परिच्छेद क्र. ५१ (ई) नुसार याचिकाकर्त्या मजूंरांना ठेकेदाराने ठेक्यामध्ये सामावून घेणे आवश्यक आहे.

१०. ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ प्रशासनावर राहणार नाही.

११. ठेकेदार व्यक्तीस/संस्थेस उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

१२. ठेक्यासंबधी इतर सर्व अधिकार विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना/विद्यापीठ प्रशासनाला राहतील.

ठेकेदाराची सही :.........................................

ठेकेदाराचे नांव :.........................................

एकात्मिक कृषि पध्दती संशोधन प्रकल्पांतर्गत सेंद्रीय शेती संशोधन प्रकल्प
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, जि. रायगड

दि. ०१ जानेवारी २०२४ ते २० मार्च २०२४ या कालावधीत करावयाच्या कामाची यादी

१) २०२३—२०२४ रब्बी हंगामामधील प्रयोगाची लागवढीपूर्व तयारी करणे.

२) प्लॉट नं. ४ (NPOF) चवळी प्रयोगातील लागवड करण्यासाठी प्लॉटची नांगरणी करूण प्लॉटची पूर्वतयारी करणे

३) प्लॉट नं ६ (NPOF) हरभरा व वाल लागवड केलेल्या पिकामध्ये वेळोवेळी गवत काढणे विडर मारणे तसेच कांदा व वांगी नर्सरीमधील बेणणी करणे लागवड करणे वेळोवेळी बेणणी करणे.

४) भाजी विक्री करणे व पाण्याचे व्सवस्थापन करणे

५) प्लॉट नं ३ (NPOF) प्रयोगामधील नांगरणी करणे ट्रिटमेन्ट नुसार मका व चवळी अंतरपिकाची लागवड करणे तसेच सेंद्रीय खताचे संस्कारनिहाय खते देणे

६) सेंद्रीय शेती संशोधन प्रकल्पांतर्गत घेण्यात आलेल्या प्रयोगातील अंतर मशागतीची कामे तसेच पिकसंक्षणाची कामे करणे.

७) प्रयोग शाळेत रासायनिक पृथकरण करण्यास वेळोवेळी मदत करणे.

८) (NPOF) योजनेतील विविध प्रयोगाची वाढीची व उत्पादनाची निरीक्षणे घेणे.

९) बांधवरील व मुख्य रस्त्यावरील तसेच प्रक्षेत्राच्या बांधावरील गवत काढणे व कुंपन दुरूस्त करणे

१०) आयत्यावेळी उद्‌भवणारी इतर अनुषंगीक कामे करणे.

ठेकेदाराची सही :........................................

ठेकेदाराचे नांव:........................................